# मागासवर्गीयांच्या सामाजिक व आर्थिक विकासाचे शासकीय स्वरूप :- एक आढावा

**डॉ. राजेंद्र बी भांडवलकर**
*प्राचार्य, अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ*
*rbbhandwalkar@gmail.com*

**सतीश हरिदास मेश्राम**
*संशोधक विद्यार्थी अर्थशास्त्र*
satish20132013@gmail.com

❖ **प्रस्तावना :-**

स्वातंत्र्योत्तर काळात भारताने लोकशाही शासनाचा स्वीकार करून राजकीय न्यायाबरोबरच आर्थिक व सामाजिक न्यायाचे उद्दिष्ट निर्धारित केले. देशाचा सर्वांगीण विकास हा त्या देशातील समाज व्यवस्थेची रचना शासनाची विकासाची विविध महत्वपूर्ण धोरणे व धोरणांची प्रत्यक्ष अंमलबजावणी यावर अवलंबून असतो. त्यामुळे याच आधारावर भारतासारख्या बहुसंख्य लोकसंख्या असलेल्या देशात जात, धर्म, लिंग, आधारित विषमता असणाऱ्या समाजात केवळ नागरी राजकीय क्षमतेची हमी देणे अपुरे ठरले असते. म्हणून घटनाकारांनी देशाचा सर्वांगीण व शाश्वत विकासासाठी आवश्यक असलेली परिस्थिती देशात निर्माण करण्यासाठी शासन व्यवस्था कशी असावी?याविषयी विचार मंथन करून देशाची राज्यघटना तयार केली व त्यामध्ये विविध घटनात्मक तरतुदी, विकास, धोरणे, योजना व कार्यक्रमाद्वारे आर्थिक दुर्बल घटकांचा विकास हाती घेतला.

❖ **मागासवर्गीयांची पार्श्वभूमी :-**

जाती व्यवस्था भारतीय समाज व्यवस्थेचा एक अविभाज्य घटक आहे. प्राचीन सिद्धांतानुसार समाज व्यवस्थेतील उच्च-कनिष्ठ म्हणून शूद्रांना अतिशय कनिष्ठ दर्जा प्राप्त झाला, त्यामध्ये मागासवर्गीय व इतर मागासवर्गीयांचा समावेश होतो. मागासवर्गीय म्हणजे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, व राजकीय दृष्ट्या मागास असलेला समाज घटक म्हणून ओळखला जातो. ज्यांना ऐतिहासिक दृष्ट्या विविध कारणामुळे उपेक्षा आणि अन्याय सहन करावा लागला आहे.

जातीव्यवस्थेमुळे मागासवर्गीय समुदायांना शिक्षण, रोजगार, आणि सामाजिक प्रतिष्ठा यासारख्या मूलभूत अधिकारापासून वंचित ठेवले गेले, ज्यामुळे त्यांची स्थिती आणखी दयनीय झाली. ब्रिटिश सरकारने काही सुधारणा केल्या जसे:-की, अस्पृश्य विरोधी कायदे, शिक्षणाच्या संधी, उपलब्ध करून दिल्या, परंतु जाती व्यवस्था कायम राहिली.

❖ **मागासवर्गीयांच्या समस्या :-**

भारत देशामध्ये मागासवर्गीय जातीची संख्या फार मोठ्या प्रमाणावर आहे. मागासवर्गीय समाजाला ऐतिहासिक दृष्ट्या विविध सामाजिक, शैक्षणिक, आणि आर्थिक अडचणीचा सामना करावा लागला आहे. या अडचणीचे मुख्य कारण म्हणजे जातीव्यवस्थेतील भेदभाव. ज्यामुळे त्यांना शिक्षण, रोजगार, व सामाजिक प्रतिष्ठा यासारख्या संधीपासून वंचित ठेवले गेले. पारंपरिक व्यवसायात पारंगत असलेला मागासवर्गीय समाज हा यंत्र आणि आधुनिककरणामुळे त्यांच्या व्यवसायापासून दूर जात आहे, त्यांचे पारंपारिक व्यवसाय त्यांच्यापासून हिरावून घेतल्या जात आहे. त्यामुळे पारंपरिक व्यवसाय धोक्यात येऊ लागले आहे, त्यांचे कला कौशल्यांचे सुप्त गुण लोप पावत आहे. परिणामी मागासवर्गीयांच्या अनेक आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, व राजकीय समस्या निर्माण झाले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक समाजसुधारकांनी लाभवंचित समूहांना समसमान सामाजिक न्याय व प्रतिष्ठा गाठता यावी या दृष्टीने आंदोलने चळवळी उभ्या केल्या यामध्ये महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजश्री शाहू महाराज, पेरियार, यांनी जातीभेद नष्ट करण्यासाठी अनेक प्रयत्न व आंदोलने केली, व समाज प्रबोधने सुद्धा, इतरही अनेक समाजसुधारकांनी यात योगदान दिले आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर दुर्बल व दुर्दैवी बांधवांना सहाय्यक करण्याची व त्यांना विकासाची संधी प्राप्त करून देण्याची जबाबदारी जशी समाजाची होती, तशीच ती शासनाची सुद्धा होती. तेव्हा या आर्थिक व सामाजिक दुरावस्थेतून मागासवर्गीयांचा विकास होण्याच्या दृष्टीने भारतीय घटनेमध्ये 341अनुच्छेदा नुसार विविध तरतुदी करण्यात आल्या.

❖ **मानवी हक्काचा जाहीरनामा व भारतीय राज्यघटनेतील तरतुदी :-**

मानवी हक्काच्या बाबतीत 10 डिसेंबर 1948 साली संयुक्त राष्ट्रसंघाने स्वीकारलेला मानवी हक्काचा जाहीरनामा त्यातही जात, धर्म, वंश, पंथ, यांच्या पलीकडे जाऊन व्यक्तीला प्राधान्य देऊन स्वातंत्र्य, समता, आत्मसन्मान, शिक्षण, विकास, जीवनमान व सुरक्षितता ही मूलभूत तत्वे मान्य करण्यात आली. भारतीय राज्यघटनेच्या उद्देश पत्रिकेनुसार भारतीय संविधान हे एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्याचे प्रतीक आहे. यात स्वातंत्र्य, समता , बंधुता व न्याय ही तत्वे मान्य करून प्रत्येक नागरिकाला समान संधी व समान दर्जा प्राप्त करून दिला, तसेच जाती

व्यवस्थेच्या आधारावर निर्माण झालेली विषमता दूर करण्याच्या दृष्टीने विशेष व्यवस्था करण्यात आली.

❖ **मागासवर्गीयांकरिता नेमण्यात आलेले आयोग:-**

मागासवर्गीयांसाठी आयोग म्हणजेच "मागासवर्गीय आयोग" (Backward Classes Commission) हा एक सरकारी आयोग आहे, ज्याचा उद्देश समाजातील मागासवर्गीय समुदायाच्या आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे, तसेच त्यांच्या कल्याणासाठी उपयुक्त शिफारसी देणे आहे. केंद्र शासनाने 29 जानेवारी 1953 मध्ये राज्यघटनेच्या कलम 341 अनन्वे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक मागासवर्गीयांची स्थिती जाणून घेण्याकरिता एक आयोग नेमण्यात आला, काका कालेलकर आयोगाने 2399 मागासवर्गीय जातीजमाती व 837 अति मागासवर्गीय जाती असे वर्गीकरण केले व आपला अहवाल 1955 मध्ये सादर केला. यात मागासवर्गीयांचे वर्गीकरण करताना परंपरागत व्यवसाय, साक्षरतेचे प्रमाण किंवा त्यांची सामान्य प्रगती त्या जमातीची किंवा जातीची अंदाजे लोकसंख्या आणि राज्यामध्ये त्यांचे वितरण किंवा एखाद्या विशिष्ट भागातील वास्तव्य लक्षात घेतले होते. परंतु केंद्र शासनाने या आयोगाच्या शिफारशी स्वीकारल्या नाही. केंद्र शासनाने 1 जानेवारी 1979 मध्ये दुसरा अखिल भारतीय मागासवर्गीय आयोग स्थापन केला. राज्यघटनेच्या कलम 341 अनन्वे सामाजिक व शैक्षणिक निकष ठरविणे या आयोगाचे काम होते. या वर्गाच्या उत्थानाकरिता तरतूद स्पष्ट करून 31 डिसेंबर 1980 ला या आयोगाने अहवाल सादर केला या आयोगाने सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गीय ठरविण्याकरिता 11 निकष तयार केले. ते 11 निकष सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक या शीर्षकाखाली वर्गीकृत केले आहे. व्ही.पी.सिंग शासनाने 1990 मध्ये मंडल आयोगाच्या शिफारसी लागू करण्याचे जाहीर केले, त्यामुळे मागासवर्गीयांकरीता केंद्र शासनाच्या नागरी सेवांमध्ये तसेच सार्वजनिक क्षेत्रातील वित्तीय संस्थांमध्ये 13 टक्के आरक्षण ठेवण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार भारत सरकारने National Commission for Backward classes 1993 द्वारा मागासवर्गीयांसाठी कायमस्वरूपी राष्ट्रीय आयोगाची स्थापना केली. कलम 341 नुसार सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या समाजाची स्थिती व समस्यांचा अभ्यास करणे आणि त्यानुसार शासनाला शिफारसी करण्यासाठी या आयोगाची निर्मिती केली.

❖ **मागासवर्गीयांच्या विकासासाठी केंद्र व राज्य सरकारचे धोरण व योजना:-**

समाजातील उपेक्षित दुर्बल घटकांना मुख्य प्रवाहात आणण्या बरोबरच आणि त्यांचा सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीने केंद्र व राज्य सरकार अतिशय उपयुक्त अशा योजना व धोरणे राबवीत आहे. या अंतर्गत ई – स्कॉलरशिप ,घरकुल योजना, शैक्षणिक सुविधा, प्रशिक्षण योजना ,वस्तीगृहाची निर्मिती, आरोग्य विषयक सोयीसुविधा, यासारखे अनेक योजना शासन राबवित आहे त्याचबरोबर स्वयंम रोजगारासाठी स्थापन केलेले विविध महामंडळे कार्यरत आहे.

❖ **सामाजिक न्यायविभागाअंतर्गत विविध महामंडळे:-**

सामाजिक न्याय विभागाअंतर्गत मागासवर्गीय आणि दुर्बल घटकांच्या आर्थिक उन्नतीसाठी विविध आर्थिक विकास महामंडळे कार्यान्वित आहे. त्यामध्ये संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ ,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व आर्थिक विकास महामंडळ , तसेच 9 मार्च 2023 तत्कालीन शासनाने स्वातंत्र्यानंतर आर्थिक दृष्ट्या मागास असलेल्या लिंगायत ,गुरव, रामोशी, वडार, अशा समाजाच्या उन्नतीसाठी नवीन पाच महामंडळाचा अर्थसंकल्पात समावेश करण्यात आलाआहेत. या महामंडळामार्फत आर्थिक विकासाच्या वैयक्तिक लाभाच्या विविध योजना राबविण्यात येतात यामध्ये प्रामुख्याने बीज भांडवल योजना, थेट कर्ज योजना ,इत्यादी योजनांचा समावेश असून याद्वारे या घटकांचे आर्थिक दृष्ट्या सक्षमीकरण करण्यात येते.

❖ **आर्थिक दुर्बल घटकातील बेरोजगारी व दारिद्य दूर करण्यासाठी शासनाचे जिल्हास्तरीय प्रयत्न:-**

सर्व समावेशक वृद्धींच्या उद्दिष्ट पूर्ततेसाठी समाजाच्या सर्व घटकांना रोजगार संधी मध्ये वाढ होणे आवश्यक आहे .सर्व सामाजिक गटांच्या कल्याणासाठी महाराष्ट्र शासनातर्फे जिल्हास्तरावर निरनिराळया योजना राबविण्यात येतात. यामध्ये महाराष्ट्र हमी योजना, स्वर्ण जयंती, ग्राम रोजगार योजना ,सामाजिक सुरक्षा योजना गृहनिर्माण योजना, स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण ,यासारख्या अनेक योजना शासन राबवित आहे. वीस कलमी कार्यक्रमांतर्गत सामाजिक असुरक्षितता, निरक्षरता, बेरोजगार व दारिद्य दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. सर्वांना न्याय वागणूक आणि सामाजिक लाभांमध्ये समान वाटा मिळणे गरजेचे आहे, त्यामुळे त्यांना समान पातळीवर आणण्यासाठी शासनाने अनेक विकासात्मक कार्यक्रम हाती घेतले आहे .अशा रीतीने सर्व समावेशक विकास साध्य करण्यासाठी विविध विकासात्मक योजना राबविण्यात येतात, त्यामुळे ह्या योजना बेरोजगारी व दारिद्य निर्मूलन करण्यास साहायक ठरल्या आहे.

❖ **निष्कर्ष:-**

केंद्र आणि राज्य सरकार मागासवर्गीय समाजाच्या आर्थिक, सामाजिक, आणि शैक्षणिक स्थितीमध्ये

सुधारणा करण्यासाठी अनेक धोरणे व योजना राबवीत आहे. या राबवित असलेल्या योजना व धोरणांचे विकासाचे चित्र कशा स्वरूपाचे आहे, हे समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. मागासवर्गीयांची परिस्थिती, निकष ,समस्या, समाज सुधारकांचे योगदान ,स्वातंत्र्यानंतर करण्यात आलेले प्रयत्न, घटनात्मक तरतुदी, केंद्र व राज्य सरकारची धोरणे व योजना, जिल्हास्तरीय प्रयत्न या सर्व घटकांचा सविस्तरपणे ऊहापोह करण्यात आला आहे .याशिवाय मागासवर्गीय समाजाचा सर्वांगीण विकास सुनिश्चित करणे, त्यांना समान संधी मिळून देणे बेरोजगारी व दारिद्र दूर करण्यासाठी जिल्हास्तरावर प्रयत्न करणे तसेच या व्यतिरिक्त या योजना मधून एक महत्त्वाची बाब म्हणजे त्या समुदायांचा आत्मनिर्भरतेला वाव देणे आणि त्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थिरतेला बळकट करणे.

❖ **संदर्भ**:-


1) गजभिये प्रज्ञा- महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या कार्याचे आर्थिक मूल्यमापन पी.एच.डी. प्रबंध, नागपूर विद्यापीठ नागपूर

2) अहुजा राम-भारतीय सामाजिक समस्या, रावत पब्लिकेशन जयपुर प्रथम संस्करण 1995

3) मिश्रा (1996) भारतातील राज्यस्तरीय अनुसूचित जातीची महामंडळे:-वचन व कामगिरी

4) गायकवाड प्रदीप-मागासवर्गीयांच्या विकास योजना समता प्रकाशन, लष्करी बाग नागपूर पाचवी आवृत्ती 2013

5) महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल 2012- 13

6) महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ (मर्यादित) मुंबई माहिती पुस्तिका

7) लोटे रा.ज. भारतीय शासन आणि राजकारण, पिंपळापुरे अँड कंपनी प्रथम आवृत्ती जून-2003